# एकट्या राहणाऱ्या महिलांसाठी सूचना

**एकटी राहणारी महिला म्हणजे सोपे सावज असा संभाव्य हल्लेखोराचा समज होत असतो. म्हणून मूलभूत खबरदारी घ्या.**

- आपल्या एकट्या राहण्याचा गाजावाजा करू नका. घरात शिरण्याच्या सर्व जागा नेहमी बंद करा. जेथे वर्दळ आहे अशा दिशेच्या दरवाज्याच्या शक्यतो वापर करा. उदा. रस्त्याच्या दिशेने असणारे दार वापरा. पाठीमागचे दार बंद ठेवा. वापरू नका.



- दार ठोठावणारी व्यक्ती ओळखीची असेल तरच दार उघडा.
- अपरिचित व्यक्तींना थारा देऊ नका. सेवा पुरविणाऱ्या संस्थेचे प्रतिनिधी आल्यास ओळखपत्रातील नंबरवर फोन करून खातरजमा करू घ्या. दरवाज्याला साखळी आणि मॅजिक आय म्हणजे छिद्र हवेच.
- प्रवेशद्वारावर कोण आले आहे हे दाखविणारा **डोअर व्ह्यूअर** लावून घ्या.
- कोणी प्रतिनिधी/विक्रेता आल्यास प्रथम त्याला त्याचे कार्ड दाराच्या फटीतून आत टाकायला सांगा. संशय आल्यास त्याच्या मालकाला फोन करा, नाव विचारा, ओळख पटवा. हे न करणाऱ्यांशी कोणताही व्यवहार करू नका.
- कोणी दारी येऊन तातडीचा फोन करू द्या असे म्हणाला तर अशा वेळी दार उघडू नका, वाटल्यास तुम्ही स्वत: त्याच्यासाठी फोन करा.